(21) 2021-22 MRS

Smt. Sindhutai Jadhav Maha. Mehkar 330

Impact Factor - 8.572 (SJIF)
ISSN - 2278 -9308

MARCH 2022
ISSUE NO. (CCCXXXVI) 336

# B.Aadhar

Peer - Reviewed & Refereed Indexed


MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL RESEARCH JOURNAL

# SOCIAL JUSTICE AND COMMUNAL HARMONY

## IN SOUTH ASIA DURING THE LAST FIVE DECADES

Editors

Dr. Nilima Sarap | Dr. Arun Shelke
Dr. Piyush Nalhe | Asst. Prof. Dimple Mapari



This Journal is Indexed in
Scientific Journal Impact Factor (SJIF)
Cosmos Impact Factor (CIF)
International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit to : www.aadharsocial.com

Aadhar PUBLICATIONS

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575,Issue NO, 336 (CCCXXXVI )
ISSN : 2278-9308
March, 2022


| | | |
|---|---|---|
| 40 | भारतीय संविधानातील कलम-370-एक दृष्टिक्षेप प्रा. अमोल भाऊरावजी बंड | 153 |
| 41 | धार्मिक असहिष्णुतेचे कारणे व परिणाम प्रा.अभय डी. जायभाये | 157 |
| 42 | महिलांचे शोषण व मानवी अधिकार प्रा.डॉ. संतोष सदाशिव मिसाळ | 160 |
| 43 | सामाजिक असहिष्णुतेचे अध्ययनाचे दृष्टिकोन प्रा.डॉ.मेघराज रा.शिंदे | 162 |
| 44 | मुस्लीम स्त्रीप्रश्नाच्या आकलनाची दिशा प्रा.संजयकुमार कांबळे | 166 |
| 45 | अर्थशास्त्र आणि सामाजिक न्याय प्रा. जया जोशी (सहस्त्रबुद्धे) | 175 |
| 46 | अर्थशात्र व सामाजिक न्याय संदेश सूर्यभान गवारगुरू | 183 |
| 47 | महिला : प्रजनन आरोग्य आणि आरोग्यसेवा मिळण्यातील आढतळे स्नेहा झुंजरुटे | 187 |
| 48 | महिला सक्षमीकरणाच्या विविध शासकीय योजना—एक दृष्टिक्षेप डॉ. बळीराम परशराम अवचार | 192 |
| 49 | महिला सक्षमीकरण एक दृष्टीक्षेप डॉ. गणेश ए. पोटे | 197 |
| 50 | लैंगिक असमानता और सामाजिक विक्षोभ भारत एस. हरियाले | 201 |
| 51 | अकोला जिल्ह्यातील पर्यटन : एक भौगोलिक अभ्यास प्रा. अभिजीत प्र. दोड | 206 |
| 52 | भारतीय संविधान व मानवाधिकार प्रा. निता पांडे (पाठक) | 212 |
| 53 | मानवाधिकार व भारतीय संविधान या मधील संबध एक चिकीत्सक अध्ययन प्रा.डॉ.प्रशात वामनराव खेडकर | 215 |
| 54 | जातीय असहनशिलतेच्या संकल्पणेचे समाजशास्त्रीय अध्ययन डॉ.पुरूषोत्तम आर.बांडे | 221 |
| 55 | भारतीय संविधान और मानवाधिकार सौ. रूपाली अग्रवाल | 226 |
| 56 | महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील महीला वाहकांच्या समस्या कु.वर्षा काशीराम रोठे | 231 |
| 57 | भटक्या विमुक्त वासुदेव जमातीचे धार्मिक सद्भाव डॉ. श्रीकृष्ण काकडे ,उज्वला समाधान डांगे | 236 |
| 58 | शंकरलालजी (काकाजी) खंडेलवाल का सामाजीक कल्याण कार्यों का अद्ययन निशीकांत दत्तात्रय देशपांडे | 241 |
| 59 | भारतीय संविधान आणि मानवाधिकार प्रा .डॉ. दिलीप ह. सूर्यवंशी | 245 |
| 60 | स्त्री पुरुष समानतेचे बदलते आयाम : चिकित्सक विश्लेषण | 248 |

**B.Aadhar** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575,Issue NO, 336 (CCCXIV )
ISSN : 2278-9308
March, 2022

# सामाजिक असहिष्णुतेचे अध्ययनाचे दृष्टिकोन

प्रा.डॉ.मेघराज रा.शिंदे
श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय, मेहकर ,
मो. 9890193315 ,मेल– meghraj.shinde1234@gmail.

**असहिष्णुतेचा अर्थ (Meaning of Intolerance) :**

भारताला पाच हजार वर्षांचा इतिहास आहे. भारत विविधतेत एकता असलेला देश आहे. भारत भौगोलिकदृष्ट्या वेगवेगळया भागात विभागलेला आहे. भारताचे हवामान वेगवेगळया प्रकारचे आहे. भारतात भौगोलिक विविधते बरोबर सामाजिक विविधता देखिल आढळून येते. भारतात विविधतेचे अनेक स्त्रोत आहेत. असे समानशास्त्रज्ञ **एस.सी. दुबे** यांनी म्हटले आहे. भाषा धर्म संस्कृती हे तिन घटक महत्वाचे आहेत. काही अभ्यासकांनी यामध्ये जातीला देखिल महत्त्व दिले आहे. भारतात सांस्कृतीक विविधता आहे. याबाबत समाजशास्त्रज्ञामध्ये एकमत आहे. भारतात अनेक समुह आहेत. ते वेगवेगळ्या प्रकारचे आहेत. त्यांनीं स्वतःची ओळख निर्माण केली आहे. ते अधिक मजबूत व प्रबळ स्वरूपाचे आहेत. ते आपल्या गटाचे हितसंबंध पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करतात. जेव्हा त्यांचे हितसंबंध पूर्ण होत नाहीत तेव्हा समाजात दंगल हिंसाचार, जाळपोळ, खुन इ. घटना घडतात. समाजातील गट जात, धर्म, वंश या आधारावर निर्माण होतात. या गटामध्ये असहिष्णुता निर्माण होते. तेंव्हा समाजात संघर्ष निर्माण होतो. ही असहिष्णुता काही वेळा मर्यादित स्वरुपाची असते. तर काही वेडा मर्यादेबाहेर जाते. असे घडण्याला अन्य घटक जबाबदार असतात.

भारतीय समाजात दोन प्रवृत्ती आहेत. सामाजिक संघटनात्मक प्रवृत्ती समाजात संघटन निर्माण करण्याचे कार्य करते तर विघटनात्मक प्रवृत्ती समाजात विघटन घडवून आणण्याचे कार्य करते. या दोन्ही प्रवृत्ती समाजात कार्यरत असतात. त्याच बरोबर समाजात सामाजिक सहिष्णूता व सामाजिक असहिष्णूता या प्रवृत्ती देखिल कार्यरत असतात. भारतीय समाजाचे अध्ययन करतांना जात, धर्म, वंश, संस्कृती या घटकांचा अभ्यास करावा लागतो. या समुहातील संघर्षाचे अध्ययन करावे लागते. भारतीय समाजात असहिष्णुता का निर्माण झाली याचा शोध घ्यावा लागतो. हा शोध घेत असताना असा अर्थ समजून घेणे गरजेचे असते.

**असहिष्णूतेचा अर्थ :-** गटामध्ये कोणत्याही बाबतीत एकमत होत नाही. अशा स्थितीला दोन गटामध्ये दुरावा निर्माण होतो. हा दुरावा निर्घकाळ चालतो यातून असहिष्णूता निर्माण होते. समाजशास्त्रात सामाजिक असहिष्णुता असे न म्हणता असहिष्णुता असे म्हटले जाते. असहिष्णुता निर्माण होण्यास संस्कृती जबाबदार असते. दोन समुहामध्ये सामंजस्य निर्माण करणारे अनेक घटक असतात. तसेच सामंजस्य नष्ट करणारे अनेक घटक असतात. असहिष्णुता ही सकल्पना सहिष्णुतेच्या विरोधी आहे. दुसऱ्याने कोणत्या तरी गोष्टी भावनीक माणसिक स्थरावर समजून घेणे याला सहिष्णुता असे म्हणतात. यामध्ये दुसऱ्याच्या मताशी सहमत नसतो. थोडीफार सहमती किंवा पूर्ण असहमती हाच सहिष्णुतेचा अर्थ आहे. सहिष्णुता समाजाच्या दृष्टिने महत्वाची आहे. सहिष्णुतेवर समाजाचे अस्तित्व अवलंबून असते. सामाजिक एकता निर्माण होण्यामध्ये सहिष्णुतेची भूमिका महत्वाची असते.

**सामाजिक असहिष्णुतेचे अध्ययनाचे दृष्टिकोन (Social Approches of Intolerance) :**

**१) प्रकार्यवादी दृष्टिकोन :-** प्रकार्यवादी दृष्टिकोन हा समाजशास्त्रातील अध्ययनाचा एक प्रमुख दृष्टिकोन आहे. या दृष्टिकोनानुसार समाजव्यवस्थेत असहिष्णुता आढळून येत नाही. कारण समाजव्यवस्थेत निर्माण होणाऱ्या असहिष्णुतेच निर्मुलन केले जाते. समाजात सामाजिक असहिष्णुता अनेक घटकांमुळे निर्माण होते. त्यातील जात, धर्म,

वंश हे घटक महत्त्वाचे आहेत. असे असले तरीही हेच घटक समाजव्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी महत्वाची भूमिका पार पाडतात. थोडक्यात या दृष्टिकोनानुसार समाजात सहिष्णुता असते. समाजाच्या दृष्टिने सामाजिक सहिष्णुता हे एक मूल्य आहे. ते टिकवून ठेवण्याचे कार्य समाजव्यवस्था करीत असते. सामाजिक असहिष्णुता समाजात काही प्रमाणात असली तरीही तिची निर्मुलन करण्याचे कार्य समाजातील काही घटक करित असतात.

२) **संघर्षवादी दृष्टिकोन :-** संघर्षवादी दृष्टिकोन हा समाजशास्त्रातील महत्वाचा दृष्टिकोन आहे. यानुसार समाजात असहिष्णुता असते. असे म्हटले आहे. समाजात परस्पर विरोधी गट असतात. त्यांचे हितसंबंध परस्पर विरोधी असतात. त्यामुळे त्यांच्यामध्ये संघर्ष निर्माण होतो. समाजात संघर्ष ही एक वास्तविकता आहे. संघर्षामुळे समाजात परिवर्तन घडुन येते. असे या विचारवंताना वाटते. या विचाराचा जनक कार्ल मार्क्स आहे. समाजातील श्रेष्ठ कनिष्ठ वर्गामध्ये संघर्ष चालतो. समाजातील वरिष्ठ वर्ग कनिष्ठ वर्गाचे शोषण करतो. कनिष्ठ वर्ग आपल्या न्याय हक्कासाठी संघर्ष करित असतो. यातून समाजात बदल होतो. भारतीय समाजात वर्णव्यवस्था होती. त्यानंतर वर्णव्यवस्थेतून जातीव्यवस्था निर्माण झाली. त्यानंतर लोकांमध्ये ब्रिटिशांमुळे धर्मनिरपेक्षता निर्माण झाली. उदारवादी विचार सरणी निर्माण झाली. मार्क्सवादी दृष्टिकोनानुसार जात, धर्म, वंश या घटकांमुळे समाजात असहिष्णुता निर्माण होते.

भारतीय समाजात असहिष्णुता अनेक घटकामुळे निर्माण होते. असहिष्णुतेचे अध्ययन करणारे दोन दृष्टिकोन महत्वाचे आहेत.

**जाती असहिष्णुता (Caste Intolerance) :**

प्रत्येक समाजात सामाजिक विभेदन आढळून येत. सामाजिक स्तरीकरण आढळून येते. हे स्तरीकरण वेगवेगळया प्रकारचे असते. भारतीय समाजात जातीव्यवस्था आहे. ही जातीव्यवस्था प्राचिन काळापासून आढळून येते. जातीव्यवस्थेला धर्म जबाबदार आहेत. धर्माच्या आधारे जातीयता निर्माण झाली. ही जातीव्यवस्था टिकवून ठेवण्याचे प्रयत्न समाजातील काही घटकांनी केले. स्वातंत्र्यानंतर जातीव्यवस्था नष्ट करण्यासाठी अनेक प्रयत्न केले गेले. घटनेनुसार सर्वांना समानतेचे अधिकार दिले. समाजात जात, धर्म, वंश या आधारावर कोणताही भेद करता येणार नाही. अशी तरतूद करण्यात आली आहे. असे असले तरीही जातीव्यवस्थेचे अस्तित्व आजही कायम आहे. भारतीय समाजात जातीव्यवस्थेने सामाजिक असमानता निर्माण केली आहे. समाजाचे अनेक खंडात विभाजन केले आहे. समाजात अस्पृश्यता निर्माण केली आहे.

**जाती असमानतेचा अर्थ / व्याख्या :-** असमानता या संकल्पनेचा अर्थ समानतेच्या विरोधी असणे असा होता. समाजात असमानता अन्य घटकामध्ये आढळून येते. जातीव्यवस्थेमध्ये प्रतिष्ठा, क्षमता, वंश, लिंग या आधारावर असमानता निर्माण होते. जातिय असमानता अन्य घटकामुळे निर्माण होते. अनेक समाजशास्त्रज्ञांनी जाती असमानतेचा अर्थ स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचे विश्लेषण खालीलप्रमाणे करता येईल.

१) प्रा. सि. एच. कुले यांच्या मते. "अनुवंशीकतेच्या तत्त्वावर आधारलेल्या समूहाला जात असले म्हणतात."

२) मदन व मुजुमदार यांचे मते, "जात हा बंद वर्ग आहे."

३) डॉ. केतकर यांचे मते, "जात हा सामाजिक वर्ग असून यामध्ये जन्माने सभासदत्व मिळते तसेच जातीबाहेर विवाह करता येत नाही."

जातीच्या वरील व्याख्या जातीव्यवस्थेचे विश्लेषण करतात. या व्याख्यांच्या आधारे जातीव्यवस्थेमुळे समाजात भेदभाव निर्माण झाला आहे. समाजात विषमता निर्माण झाली आहे. असे लक्षात येते. जातीव्यवस्थेच्या व्याख्यांच्या आधारे जातीव्यवस्थेचे वैशिष्टये स्पष्ट करण्याचे कार्य अनेक विचारवंतांनी केले आहे. त्यातील प्रमुख विचारवंत म्हणजे एन. के. दत्तू हट्टन, डॉ जी.एस. घूर्ये इ. आहेत.

जाती असमानतेच परिणाम (**Effects of Caste Intolerance**) :

१) समाजाचे खंडात्मक विभाजन :- जातीव्यवस्थेमुळे समाजाचे अनेक खंडात विभाजन झाले आहे. जातीव्यवस्थेने अनेक जाती उपजाती निर्माण केल्या समाजातील लोकांचे विभाजन अनेक गटामध्ये केले. यांच्यामध्ये अनेक प्रकारचे भेद निर्माण केले. यामध्ये खालच्या जातीच्या व्यक्तीवर अनेक निर्बंध लाधले. त्या व्यक्तींना वरच्या स्तरात प्रवेश करणे कठीण झाले. त्यामुळे समाजात सामाजिक संघर्ष निर्माण झाले. एका समुहाचे अनेक समुहात विभाजन झाले. समाजात असमानता निर्माण झाली. त्यामुळे भारतीय एकात्मतेला अडथळे निर्माण झाले.

२) जात पंचायतीची निर्मिती :- जातीव्यस्थेमुळे जातीय गट निर्माण झाले. हे गट टिकवून ठेवण्याचे कार्य काही संस्था करू लागल्या त्या संस्था म्हणजे जात पंचायती होत. भारतीय समाजात स्वातंत्र्यपूर्व कालखंडात जात पंचायतीचे अस्तित्व होते. या जात पंचायतीत लोकांना न्याय देण्याचे कार्य करत होत्या. ब्रिटिशांनी जात पंचायत नष्ट करण्याचे प्रयत्न केले. स्वातंत्र्यानंतर जात पंचायती नष्ट करण्यासाठी अनेक प्रयत्न केले गेले. तरी देखिल जातीव्यवस्था, जातपंचायत आजही आढळुन येते. या जात पंचायतीत व्यक्ती समाजाच्या दृष्टिने विघातक आहे. समाजात असमानता निर्माण करण्याचे कार्य या करतात.

३) कनिष्ठ जातीचे शोषण : जातीव्यवस्था वरच्या वर्गासाठी पोषक आहे. जातीव्यवस्थेने कनिष्ठ वर्गाचे शोषण केले आहे. त्यामुळे कनिष्ठ वर्गामध्ये बदल झाला नाही. त्यांच्या सामाजिक आर्थिक राजकिय शैक्षणिक सांस्कृतिक सर्व क्षेत्रामध्ये जातीव्यवस्थेने हस्तक्षेप केला आहे. त्यांचे मोठया प्रमाणात शोषण केले आहे.

४) सामाजिक प्रगतीला अडथळे :- जातीव्यवस्थेमुळे समाजाची अधोगती वाढत चालली आहे. जातीव्यस्थेमुळे समाजातील काही मुठभर लोकांचे हितसंबंध जोपासले जात आहेत. त्याचे आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक फायदे होत आहेत. तसेच त्यांना समाजात मान प्रतिष्ठा मिळत आहे. असे असले तरीही जातीव्यवस्था समाजातील बहुसंख्य लोकांसाठी अपायकारक ठरत आहे. अडवळा ठरत आहे. सामाजिक समतेच्या दृष्टिने जातीव्यवस्था अडथळा ठरत आहे. त्यामुळे भारतीय समाजाची प्रगती होउ शकली नाही.

५) अस्पृष्यता :- जाती व्यवस्थेमुळे समाजाचे अनेक खंडात विभाजन झाले. समाजाची श्रेणी रचना निर्माण झाली. श्रेष्ठ कनिष्ठ असे वर्ग समाजात निर्माण झाले. यांची एक श्रृंखला निर्माण झाली. यामध्ये खूप मोठ्या प्रमाणात असमानता आढळून येते. समाजामध्ये जातीव्यवस्थेने ब्राम्हण क्षत्रिय क्षुद्र वैश्य इ. वर्ग निर्माण केले. यामध्ये क्षुद्रामध्ये क्षुद्र अतिक्षुद्र असे दोन वर्ग जातीव्यवस्थेने कनिष्ठ जातच निर्माण केले. त्यामुळे जातीव्यवस्थेमुळे समाजात अस्पृश्यता निर्माण झाली.

६) सामाजिक गतिशिलतेचा अभाव : जाती व्यवस्थेमुळे समाजाचे विभाजन अनेक घटकात झाले. जातीव्यवस्था व्यक्तीविकासाच्या दृष्टिने विघातक आहे. जातीव्यवस्था व्यक्ती विरोधी आहे. जातीव्यवस्था सामाजिक गतिशिलतेच्या विरोधी आहे. या व्यवस्थेत सामाजिक परिवर्तनाचा नव्या विचाराचा स्विकार केला जात नाही. आहे त्या विचाराचा स्विकार केला जातो. जात, धर्म, वंश, श्रद्धा या विषयी तर्कला जात नाही. त्यामुळे जातीव्यवस्थेमुळे आपला दर्जा बदलता येत नाही.

७) विकासात अडथळे :- जातीव्यवस्थेमुळे व्यक्तीवर अनेक बंधने लाधली जातात. व्यक्तीला आपल्याच जातीचा व्यवसाय करावा लागतो. त्यामुळे ज्या व्यवसायात अधिक नफा मिळतो. तो व्यवसाय व्यक्ती करू शकत नाही. त्यामुळे जातीव्यवस्था कौशल्ये, उद्योजगतेच्या दृष्टिने अडवळा ठरते. त्यामुळे व्यक्तीमध्ये निराशा निर्माण होते. भारतीय समाज मागे पडण्यात जातीव्यवस्था जबाबदार आहे.

८) राष्ट्रिय विकासात अडथळे :- जातीव्यवस्थेने अनेक समस्या निर्माण झाल्या. त्यातील प्रमुख समस्या म्हणजे जातीव्यवस्थेमुळे राष्ट्रिय एकात्मतेला बाधा निर्माण झाली. राष्ट्र म्हणून लोकांमध्ये सामुहिक एकता निर्माण करण्यामध्ये जातीय व्यवस्था अडथळा ठरली. कारण जातीव्यवस्थेने समाजाचे विभाजन अनेक गटात केले. एका गटाचे

गट उपगट निर्माण केले. त्यामुळे लोकांमध्ये राष्ट्रिय भावना निर्माण करणे कठिण झाले. या पद्धतीने जातीव्यवस्थेचा परिणाम देशावर झाला आहे.

जातीव्यवस्था, जातीअसमानतेचा अर्थ व जातीय असमानतेचे परिणाम समाजावर दूरगामी झालेले दिसुन येतात. याचे स्पष्टीकरण या मध्ये केले आहे.

**संदर्भसूची :**

1) प्रा.डॉ.प्रदिप आगलावे, सामाजिक समस्या, साईनाथ प्रकाशन, नागपूर 2020.
2) प्रा.डॉ.ए.डी. चव्हाण, सामाजिक समस्या, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर 2020.
3) प्रा.डॉ.बी.के.किर्दक, सामाजिक समस्या, अथर्व पब्लिकेशन, जळगांव, 2020.
4) प्रा.डॉ. दिलीप खैरनार, सामाजिक समस्या, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद 2019.

Coordinator - IQAC
Smt.Sindhutai Jadhao College
Mehkar, Dist. Buldana